ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 9 | June - 2016
Review Of Research

# दलित पँथरच्या चळवळीचे चिकित्सक मूल्यमापन

**प्रा. डॉ. राजेंद्र नामदेवराव मोरे**
एम.ए., सेट., नेट .,एम.फिल.,पीएच.डी. , संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि. जालना.

***प्रस्तावनाः—***

आधुनिक समाज आणि समाज जीवनाचे चळवळ हे व्यवच्छेदक लक्षण होय. समाज आणि समाज जीवनात नवपरिवर्तनाच्या हेतूने सामूहिकरित्या केलेला तो प्रयत्न असून याची समूहाच्या वर्तनाशी घनिष्ठता असते. सामाजिक चळवळीचा विचार करता सुधारणावादी क्रांतीकारी, प्रतिगामी, निषेध, प्रतिकार, आदर्शवादी, वर्ग वांशिक असे विविध प्रकार दृष्टिस येतात. भारतीय लोकशाहीच्या अनुषंगाने सामाजिक चळवळी सामूहिक सहभागाचा विचार करता स्वातंत्र्यानंतरच्या चळवळीचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्राच्या संदर्भात दलित पँथर चळवळीचा उल्लेख अप्रस्तुत ठरत नाही.



'दलित' हे भारतीय सामाजिक-धार्मिक व्यवस्थेचे फलित असून या शब्दातून अनुसूचित जमाती, नवबौद्ध, कामकरी, भूमीहीन, गरीब, शेतकरी, स्त्रिया या सर्व राजकीय, आर्थिक व धार्मिक आधारावर शोषित ठरणाऱ्यांचा समावेश होतो.

आंबेडकरांच्या नंतरची दलित चळवळ ही वैचारिक टोकदारपणा, आक्रमकता आणि संपूर्ण समाज परिवर्तनाचा प्रखर आग्रह यासाठी ओळखली जात होती. रिपब्लीक नेतृत्वाला न जुमानणाऱ्या कार्यकर्त्यांनी दलित पँथरची स्थापना केली. दलित पँथरच्या चौकटीभोवती राजकीय चौकट बदलली. राजकीय हिंदुत्वाचा उदय व विस्तार झाला आणि नव्या आर्थिक धोरणाच्या रूपाने अर्थव्यवस्थाही बदलली. मंडल शिफारशीमुळे आणि १९९३ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर विवादित आरक्षण धोरण अधिक व्यापक बनले. मात्र त्याच वेळी जातिनिर्मूलन आणि समाजपरिवर्तन हे मुद्दे सामाजिक जाणिवेत काही काहीसे बाजुला पडून सत्ताप्राप्ती व राज्य संस्थेवर नियंत्रण आदि मुद्यांना प्राधान्य आले.

रिपब्लीकन पक्षाचे हे सर्वांगिन अपयश त्या पक्षातील व्यक्तीवर पोटजातीवाद व त्यावर आधारित गटबाजी, त्याची वैचारिक दिवाळखोरी आणि संघटनात्मक विस्कळीतपणा, दलित समाजातील आवाहने पेलण्यास अपूरे पडणारे त्याचे एवढेच आणि निवडणूक केंद्री राजकारण, कचखाऊ नेतृत्व आणि ग्रामीण व झोपडपट्टीतील दलितांपासूनचे त्यांचे दुरावलेल्या या सर्व कारणांनी हवालदिल झालेल्या दलित समाजाला १९७० च्या वळणावर स्थापन होऊन झपाट्याने वाढलेल्या दलित पँथरने बराच दिलासा दिला होता.[१] दलितांमधील सुशिक्षीत युवावर्गास वंचितता, अन्याय शोषणाची जाणीव झाल्याने आक्रमक व बंडखोर दलित पँथरचा उदय झाला. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि.पवार, डांगळे, गिरकर, चेंदवणकर, सोसटे, थोरात, खरात, करबे लढाऊ व आक्रमक भूमिका घेऊन मैदानात उतरले. सवलतींच्या व निवडणूकीच्या नेभळट

राजकारणाला तसेच हिंदूमधील पुनरूज्जीवनवादी शक्तींना स्पष्ट विरोध करून सर्वांगिण क्रांतीची जहाल भाषा हे तरूण उच्चारीत होते.

दलित पँथरच्या निर्मितीचे तात्कालीन कारण गावोगावच्या स्त्री-पुरूषांवर अत्याचार वाढत होते. दलितांवर स्थानिक प्रस्थापित लोकांनी आणलेले दहशतीचे सावट जशास तसे उत्तर देवून निस्तारले जाऊ शकते अशी त्यांची धारणा होती. नवबौद्ध समाजाची ससेहोलपट, सध्या समाजात वाढत चाललेली बेकारी आणि आरक्षण धोरणाची अपूरी अंमलबजावणी या परिघात पँथरचे प्रारंभिक राजकारण होते. पँथरच्या नेत्याचा कल डाव्या पुरोगामी विचाराकडे होता. पँथरच्या भूमिकेचे स्पष्टीकरण करतांना नामदेव ढसाळ यांनी निवेदन प्रकाशित झाले होते.[२]

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी संपूर्ण जमीनीचे फेरवाटप करावे लागेल. इथली ग्रामरचना समाज रचना, धर्मश्रद्धा व मनोरचना इ. गोष्टी आमुलाग्र बदलून लोकशाहीशी सुसंवादी कराव्या लागतील. स्वातंत्र्याचे बेगडी स्वरूप बदलुन खऱ्या अर्थाने श्रमिकांच्या हाती सत्ता देणारे स्वातंत्र्य मिळवावे लागेल. भांडवलशाहीच्या सरंजामशाहीच्या दारात गहाण पडलेली संसदीय लोकशाही मुक्त करावी लागेल आणि हे सारे करायचे तर दलित चळवळीची व्याप्ती केवळ पूर्वास्पृश्य समाजांपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही तर अनुसूचित जाती-जमाती, कामगार, भूमीहीन शेतमजूर, भटक्या-विमुक्त जमाती, आदिवासी व सर्वहरा या सर्वांनी एकत्र करून जगण्याचे प्रश्न हाती घ्यावे लागतील. त्या प्रश्नांच्या आधारे चळवळी उभाराव्या लागतील. वर्णव्यवस्था व वर्गव्यवस्था मोडू पाहणाऱ्या सर्व क्रांतिकारी शक्तींशी तसेच आर्थिक व राजकीय दडपशाहीला बळी पडलेल्या सर्व सामाजिक घटकांशी दोस्ती करावी लागेल अशी मांडणी करून एका १८ कलमी क्रांतीकारक कार्यक्रम प्रस्तुत निवेदनात अंतर्भूत करण्यात आला.

महाराष्ट्रात १९६०-७० दरम्यान वाढलेली कामगार चळवळ कामगारात दलितांचे प्रमाण बरेच असल्याने कामगार नेत्यांच्या मार्क्स-लेनिनवादी विचार सरणीचा त्याच्यावर निर्माण झालेला प्रभाव व काही दलित नेत्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे मार्क्स-लेनिनवादी दृष्टीकोनातून विश्लेषण केले आहे. १९६४-६५ आणि १९७१-७३ मधील महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमुळे शहरातील दलित विद्यार्थ्यांना गावातील त्यांच्या कुटुंबाकडून होणारे थांबलेले अर्थसाहाय्य अनेकांचे खंडीत होऊन गावात परतल्याने परिवर्तन प्रक्रियेला चालना मिळाली. सिध्दार्थ आणि मिलिंद महाविद्यालयातून शिष्यवृत्ती, राखीव जागा व शैक्षणिक सवलतींचा लाभ घेवून विद्यार्थी बाहेर पडतो. सर्वच राजकीय पक्षांनी दलिताच्या समस्याकडे पाठ फिरवल्याने त्यांचा भ्रमनिरास झाला. काँग्रेस - रिपाई युतीमुळे दलितांतील शिक्षित ध्येयवादी तरूण वर्गाने संतप्त होत लढ्याची भाषा बोलण्यास सुरूवात केली. सनातनी व्यवस्थेवर व्यापक पातळीवर हल्ला करणारे निर्माण झालेले विद्रोही व स्फोटक साहित्याची निर्मिती झाली.[३] परंतु प्रत्यक्षात दलित पँथरलाही दलित चळवळींची कोंडी फोडता आली नाही. दलित-दलितेत्तर शोषितांची संयुक्त फळी तर ती उभारू शकली नाहीच पण दलितांतर्गत सर्व जातीच्या लोकांना ती सोबत घेऊन उभी राहू शकली नाही. क्रांतीकारी शक्तीची चिवटपणे बांधणी करण्यापेक्षा भडकत्या भावनाचे राजकारण करण्याची दलित चळवळींची पूर्वपरंपराच पँथरांनीही पुढे चालवली. वैचारिक प्रगल्भ कार्यकर्त्यांना जोडण्याचे काम त्यांनी केले नाही. मुंबईच्या महानगरीय वातावरण तर काही गुंड घटकांनीही दलित पँथरचा आसरा घेऊन काही काळ आपला कार्यभाग साधला. उलट डाव्या पक्षाच्या आपआपसातील मारामाऱ्यामुळे दलित पँथर दुबळी झाली.

दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष श्री. राजा ढाले यांनी दलित पँथर बरखास्त केल्याची घोषणा केली. त्यामुळे दलित पँथरचे स्वतंत्र अस्तित्व ठेवू मागणारे दलित तरूण नेते अरूण कांबळे, गंगाधर गाढे, दयानंद म्हस्के, रामदास आठवले यांनी १० एप्रिल १९७७ च्या बैठकीत दलित पँथरचे अस्तित्व कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत माहिती नूतन अध्यक्ष अरूण कांबळे यांनी पत्रकारांना दिली. त्यात त्यांना म्हटले होते, ''लोकशाही धोक्यात आली असतांना व्यक्ति स्वातंत्र्यावर गदा आली असतांना राजा ढाले यांनी संघटना वांझ व निष्क्रिय ठेवली व ऐन निवडणुकीच्या काळात कोणालाही विश्वासात न घेता हुकुमशाही पद्धतीने दलित पँथर बरखास्त झाल्याचे घोषित केले. त्यांचा हा निर्णय कार्यकारणीने फेटाळला आहे. राजा ढाले यांचे नेतृत्व फेटाळून दलित पँथरचे कार्य महाराष्ट्रात जोमाने चालू ठेवण्याचा निर्णय कार्यकारणीने घेतला आहे.''[४] या नवीन पँथरच्या जन्मानंतर पदाधिकारी यांनी आपले राजकीय व सामाजिक अस्तित्व दाखवायचे होते. पुढे पँथर नेते म्हणून नावाला आलेले अरूण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाढे, दयानंद म्हस्के,

प्रीतम शेगावकर यांनी या संघटनेला मोठे करण्यासाठी काही कार्यक्रम घेतला. त्यात 'नामांतर लढा' हा त्यांच्या संघटनेला संजीवक ठरला.

कालांतराने ढाले-पवार प्रभृती कार्यकर्ते 'मास मुव्हमेंट' या बॅनरखाली चळवळ चालू लागले. रामदास आठवले-अरूण कांबळे यांची पँथर आज अधिकृत पँथर म्हणून वावरत आहे. आज पँथर जागृत व क्रियाशील दिसत असली तरी तिच्यात वैचारिक शिस्त बेताचीच आहे. नामांतराचा प्रश्न किंवा रिडल्स प्रकरण अशा प्रश्नावर जोरदार आवाज उठवणारी ही संघटना दलित-शोषितांच्या आर्थिक प्रश्नावर सातत्यपूर्ण लढे करताना यात फारशी कुठे आढळत नाही. मास मुव्हमेंटने गावोगाव आपल्या छावण्या स्थापन केल्या असल्या तरी नवबौद्धाची एक सामाजिक-सांस्कृतिक संघटना एवढेच तिने आपले कार्यक्षेत्र ठरवलेले दिसते.

### चळवळीचे यश :

पिढ्यान्पिढ्या दुसऱ्याच्या तिरस्कारावर, दयेवर जगणाऱ्यांना आत्मविश्वास व धैर्य दिले. अस्पृश्य वर्गाबद्दलची सहनशिल, बधीर, मुके ही जनमानसातील जुनी धारणा पँथरने नष्ट केली. जातीयवाद, शोषण, अन्याय, पाशवी अत्याचाराविरूद्ध त्यांनी आवाज उठवला. सत्ताकारणाच्या राजकारणाला प्रतिबंध करून वाङ्‌मय क्षेत्रात नवे साहित्य निर्माण केले.

### चळवळीचे अपयश :

चळवळीचे नेते हे अनुभव व राजकीय पार्श्वभूमीचा अभाव असल्याने अंतर्गत गट-तट निर्माण होत गेले. व्यवहारी दृष्टिकोनाचा अभाव दिसून आला. उपक्रमात तसेच लढ्यात सातत्य नसल्याने दिर्घ मुदतीचा कार्यक्रम हाती घेता आला नाही. परिपक्व मार्गदर्शक, निःस्वार्थी नेत्याची कमतरता, वैचारिक बांधीलकीचा अभाव त्यामुळे वैयक्तिक शत्रुत्व निर्माण झ ााले. विचार सरणीपेक्षा भावनिकतेच्या आधारावर नेते एकत्र आले. राजकीय पक्षांनी विविध स्वरूपात मदत घेऊन तसेच युती घडवून चळवळ बोथट झाली. पँथरची अतिरेकी भूमिका, शिवराळ भाषा, कडवट टिका यामुळे पुढारलेल्या दलित तरूणांनी चळवळीत जाण्याचे टाळले.

### शक्यतांचा शोध :

दलित राजकारणाला केवळ सत्तावादाकडून परिवर्तनाच्या मुद्याकडे वळवणे, राज्या-राज्यातील भिन्न दलित जातीचे ऐक्य निर्माण करणे, दलित-ओबीसी जातीची एकजूट राजकीय-सामाजिक अशा दोन्ही पातळीवर व्हायला हवी. खऱ्याखुऱ्या कष्टकऱ्यांची चळवळ करणे, बहुजातीच चळवळी आकाराला आणणे इ. शक्यता शोध घेता येईल. दलित कार्यकर्त्यामध्ये जागतिकीकरण व हिंदू जमातवादाला विरोध करण्याचा सजगपणा आहे. संविधानाच्या परिक्षणाला भावनिक कारणाने विरोध करणारे कार्यकर्ता जमातवादाच्याही विरोधात असतो ही बाब दलित चळवळीच्या दृष्टिने उत्साहवर्धक आहे. सामान्य जनतेच्या लढ्यासाठी अवकाश निर्माण करणे, बहुविध सांस्कृतिक संवेदनशीलता व आदर करणारी लोकशाही राष्ट्रवाद उभा करणे जमातवाद्यांच्या विरोधात आहे. कल्याणकारी व लोकशाहीवादी राहण्यातच आम दलितांचे हित आहे. ही बाबासाहेबांची शिकवण अजेंडा म्हणून दलित दळवळीने बांधून घेणे गरजेचे आहे.

### निष्कर्ष :

पँथर्सचे स्वप्न संपुष्टात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संकुचित वारसा शिल्लक राहिला. जातीअंत, समता व परिवर्तन ह्या उद्दिष्टांचा वारसा मागे पडला. काही चळवळ राखीव जागा, वाढत्या दलित कर्मचारी संघटना, शिष्यवृत्ती इ. मुद्यांच्या परिघाभोवती फिरत राहिली. आंबेडकरी सुत्राकडे दुर्लक्ष होऊन वैचारिक वारसा संकुचित झाला. चळवळीची जागा राजकारणाने घेतली.

१. संपादक प्रा. रमेश पानसे, चेतना महाविद्यालय वांद्रे (पूर्व) सन १९८९ पृ. ६६

२. कित्ता पृ. ६७.
३. डॉ. ज्ञानेश्वर शंभरकर, दलित पँथर एक सामाजिक चळवळीची मिमांसा, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद स्मरणिका दि. १३, १४ व १५ फेब्रुवारी २००९ पृ. ३७.
४. प्रा. सुधीर गव्हाणे, नामांतर लढा, एक शोध यात्रा, परिवर्तन पब्लिकेशन्स मुंबई, जाने. १९९६ पृ. २०,२१.